# <u>प्रेस नोट</u>

**<u>पुणे अग्निशमन दलाकडून शिवाजीनगर व नवी पेठेत क्लासेसची तपासणी सुरू</u>**

मा. महापालिका आयुक्त यांनी दिलेल्या आदेशानुसार अग्निशमन प्रमुख गणेश सोनुने यांनी काल लोहगाव परिसरातील पीजी व होस्टेल्सची आग प्रतीबंधक दृष्टीने तपासणी करून अनधिकृत व विनापरवाना पीजी व होस्टेल्सवर कारवाई करून त्यांना सात दिवसांत नियमांचे पालन करून पुर्तता करण्याचे आदेश दिले आहेत.

याच अनुषंगाने आज शिवाजीनगर, नवी पेठ आणि लोहगाव येथील एकुण ३६ आस्थापनांपैकी २१ पीजी व होस्टेल, १३ क्लासेस, १ अभ्यासिका व १ फिटनेस जीम यांची अग्निसुरक्षाविषयक यंत्रणेची तपासणी करण्यात आली असता सदर ठिकाणी नियमांचे पालन होत नसून, सदर बांधकामास तसेच होस्टेल व पीजीकरिता आवश्यक कोणतीही परवानगी आढळून आली नाही. बिल्डिंग परमिशन, ड्रेनेज, पाणीपुरवठा, झाडे, स्ट्रक्चरल, कर विभाग तसेच अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्र अशा कोणत्याही प्रकाराची परवानगी आढळून आली नाही.

क्लासेसमधील विद्यार्थ्यांच्या दृष्टीने दोन दरवाजे, निकास मार्ग, अग्निरोधक उपकरण, जीने, पॅसेज तसेच स्थायी व अस्थायी अग्निशमन यंत्रणा या बाबी काही ठिकाणी उपलब्ध नसल्याचे आढळून आल्याने या आस्थापना सील का करण्यात येऊ नये अशी नोटीस बजावत नियमांची पुर्तता करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

" महापालिका आयुक्त यांच्या आदेशानुसार अशा क्लासेस व इतर आस्थापना यांनी अग्निसुरक्षाविषयक नियमांची पुर्तता न केल्यास त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येणार असून त्या बंद ठेवण्यात येतील. तसेच अशा पीजी क्लासेस शाळा रुग्णालय यांच्या मालकांवर गुन्हा दाखल करण्यात येणार आहे"